3/५

**शासकीय/निमशासकीय कार्यालये (विभागीय/जिल्हा स्तर व तालुका स्तरावर)शासन संचलित शैक्षणिक संस्था इ. मध्ये मान्यवर राष्ट्रीय/राज्य स्तरीय नेत्यांची छायाचित्रे लावण्याबाबत..**

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन परिपत्र क्र. संकीर्ण १०/प्र.क्र.१३४/२००२/पं.रा १
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ७ जून, २००२.

**परिपत्रक**

शासकीय/निमशासकीय कार्यालये व सभागृहात राजकीय नेत्यांची छायाचित्रे लावण्याची प्रथा पूर्वापार चालत आलेली आहे. ही छायाचित्रे लावण्यावरुन काही वाद होऊ नयेत या हेतूने शासनाने वेळोवेळी शासकीय/निम शासकीय कार्यालयात कोणत्या मान्यवर राष्ट्रीय/राज्य स्तरीय नेत्यांची छायाचित्रे लावावीत याबाबतचे आदेश निर्गमित केलेले आहेत. या आदेशांची संक्षिप्त माहिती मान्यवरांच्या नांवासह व आदेशांच्या तारखेसह सोबत जोडली आहे. यावरुन असे आढळले की, शासकीय कार्यालये/निम शासकीय कार्यालये/सभागृह/शैक्षणिक संस्था इ. ठिकाणी शासनाने मान्य केलेल्या २४ मान्यवर राजकीय/सामाजिक नेत्यांव्यतिरिक्त इतर कोणती छायाचित्रे लावणे नियमानुसार योग्य नाही. तथापि, या आधी जिल्हा / तालुका पातळीवरील स्थानिक स्वराज्य संस्थांनी ठराव करुन जी छायाचित्रे लावली असतील ती आता काढणे योग्य होणार नाही. मात्र, यापुढे शासनाच्या मान्यतेशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थाच्या कार्यालयात व सभागृहात शासनाचे वर नमुद आदेशात मान्य नेत्यांची छायाचित्रे वगळता अन्य कोणतीही छायाचित्रे

\\Man-012-019\c\My Documents\NOTE\PHOTO.lwp

लावण्यात येऊ नयेत. सबब या परिपत्रकाद्वारे शासन असे आदेश देत आहे की, यापुढे शासकीय कार्यालये, सभागृहे, शैक्षणिक संस्था, निम शासकीय कार्यालये इ. मध्ये शक्य तो सोबतच्या परिपत्रकात नमूद केलेल्या राष्ट्रीय/राज्य स्तरावरील मान्यवर राजकीय नेते व सामाजिक कार्यकर्त्यांचीच छायाचित्रे लावण्याची दक्षता शासकीय व स्थानिक स्वराज संस्थांतील अधिकारी/पदाधिका-यांनी घ्यावी.

त्याचप्रमाणे, शासनाकडील मंजूर निधीतून जिल्हा/तालुका/ग्राम पातळीवर करण्यात येणा-या विकास कामातंर्गत बांधण्यात येणारी धरणे, पुल, रस्ते, इमारती यांना शासनाच्या मान्यतेशिवाय कोणत्याही नेत्याचे नांव देण्यात येऊ नये, असेही आदेशीत करण्यात येत आहे.

या आदेशांची काटेकोरपणे अंमलबजावणी आवश्यक आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(कुंदा गोसावी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

अहमदनगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग१
जा.क्र.साप्रवि-१/शासन/ २४/१
अहमदनगर दि.११ /०७/२०१

प्रति,
१) प्रकल्प संचालक जिग्राविय नगर
२) खाते प्रमुख(सर्व) जिल्हा परिषद अहमदनगर
३) गट विकास अधिकारी पंचायत समिती (सर्व)

२/- आपले अधिनस्त असणा-या सर्व क्षेत्रिय कार्यालयांना याबाबत आपल्या स्तरावरुन अवगत करणेत यावे. तसे केलेबाबतचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करणेत यावा.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर करि

| अ.क्र. | नेत्यांचे नांव | शासन निर्णय,क्रमांक व दिनांक | छायाचित्राचा आकार | शेरा |
|---|---|---|---|---|
| १<br>२<br>३.<br><br>४.<br>५. | महात्मा गांधी<br>सरदार वल्लभाई पटेल<br>भारताचे राष्ट्रपती<br>(डॉ.राजेंद्र प्रसाद)<br>दादाभाई नौरोजी<br>भारताचे पंतप्रधान<br>पंडित जवाहरलाल नेहरु | शा.नि.पो.ॲण्ड सर्व्हिसेस डिपार्टमेंट<br>क्र.पोपोएस. १०५७/बी,दि.१९-४-५८<br>शा.नि.पी.ॲण्ड सर्व्हिसेस डिपार्टमेंट<br>क्र.पीपीसेस-१०५७/बी, दि.२३-९-५८ | २०"X २६"<br>१५" X २०" | मोठ्या आकाराची छायाचित्रे विभाग प्रमुख, विभागीय आणि जिल्हा कार्यालये, शासन संचालीत शैक्षणिक संस्था उदा. महाविद्यालये इत्यादी कार्यालयामध्ये लहान आकाराची छायाचित्रे वरील कार्याव्यतिरिक्त कार्यालये उदा. उपविभागीय कार्यालये, तालुका कार्यालये माध्यमिक शाळा इत्यादी कार्यालया मध्ये |
| ६ | लोकमान्य टिळक | शा.नि.पो.ॲण्ड सर्व्हिसेस डिपार्टमेंट<br>क्र.पोपोएस. १०५९/बी,दि.२४-१-५९ | २०"X २६"<br>१५"X२०" | वरील प्रमाणे |
| ७ | डॉ. एस. राधाकृष्णन | शा.नि.पो.ॲण्ड सर्व्हिसेस डिपार्टमेंट<br>क्र.पोपोएस. १०६३/बी,दि.२४-१-६३ | २०"X २६"<br>१५"X २०" | वरील प्रमाणे |
| ८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर | शा.नि.पो.ॲण्ड सर्व्हिसेस डिपार्टमेंट<br>क्र.पोपोएस. १०६४/१८७९/१५२८/बी<br>दि.२०-१-६६ | २०"X २६"<br>१५"x २०" | वरील प्रमाणे |
| ९ | लाल बहादूर शास्त्री | शा.नि.पो.ॲण्ड सर्व्हिसेस डिपार्टमेंट<br>क्र.पोपोएस. १०६५/६६३२९/बी<br>दि.११-४-६७ | २०"X २६" | वरील प्रमाणे |
| १० | महात्मा ज्योतिबा फुले | शा.नि.क्र.पोपोएस.१०६८/१७२४१/<br>१७८७/ बी दि. ४-७-६९ | ५१"X ६६"<br>३८"X५१" | वरील प्रमाणे |
| ११ | झाकीर हुसेन | शा.नि. क्र.पोपोएस. १०६७/२१४९/बी<br>दि. ७-७-६९ | ५१"X ६६"<br>३८"X ५१" | वरील प्रमाणे |
| १२ | व्ही.व्ही. गिरी | शा.नि.क्र.पोपोएस.१०७०/१३७४३/बी<br>दि.६-५-७० | | वरील प्रमाणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | आणि जिल्हा कार्यालये, शासन संचालित शैक्षणिक संस्था उदा. महाविद्यालये इत्यादी कार्यालयामध्ये लहान आकाराची छायाचित्रे वरील कार्याव्यतिरिक्त कार्यालये उदा. उपविभागीय कार्यालये, तालुका कार्यालये माध्यमिक शाळा इत्यादी कार्यालया मध्ये |
| १४ | छत्रपती शिवाजी महाराज | शा.नि.क्र.पीपीएस.१०७२/बी दि.५-८-७० | ५१"x ६६" | वरील प्रमाणे |
| १५ | श्री. फक्रूदिन अलि अहमद | शा.नि.क्र.पीपीएस.१०७४/२४९८३/बी दि.८-१-७५ | -" - | वरील प्रमाणे |
| १६ | श्रीमती इंदिरा गांधी | शा.नि.सा.प्र.वि.क्र.पीपीएस-१०८०/१७२६/२८ दि.१०-३-८१ | ४०"x ५०" | सर्व शासकीय कार्यालय (तहसील व पंचायत समित्या) यांच्या स्तरापर्यन्त व सर्व शासकीय शैक्षणिक संस्थामध्ये |
| १७ | श्री . राजीव गांधी | शा.नि.सा.प्र.वि.क्र.राचिप्र-१०८५/(११/८५)/१७२६/२८, दि.१३-२-८५ | -"- | वरील प्रमाणे |
| १८ | श्री. यशवंतराव चव्हाण | शा.नि.सा.प्र.वि.क्र.पीपीएस-१०८८/१२५४/२९ दि.१-३-८९ | -"- | वरील प्रमाणे |
| १९ | श्री. वसंतराव नाईक | शा.नि.सा.प्र.वि.क्र.राचिप्र-३३९१/प्र.क्र.१२०/२९ दि.१२-८-९१ | -"- | वरील प्रमाणे |
| २० | श्री. वसंतदादा पाटील | | | वरील प्रमाणे |
| २१ | श्री. अटलबिहारी वाजपेयी | शा.नि.प्र.क्र.८६/९८ दि.२९- १०-९८ | | वरील प्रमाणे |
| २२ | श्री. के. आर. नारायणन | शा.नि.प्र.क्र.८६/९८ दि.२९-१०-९८ | | वरील प्रमाणे |
| २३ | राजर्षी शाहू महाराज | शा.नि.क्र.राछाप्र-३३९८/प्र.क्र.१८९/९१ दि.२१-१२-९८ | | वरील प्रमाणे |
| २४ | ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले | शा.नि.क्र.राछाप्र-३३९९/२२१९/२९ दि.३-१-२००० | | वरील प्रमाणे |